www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१५ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### वणी येथील प्रचार सभेत सुधीर मुनगंटीवार यांनी दिली विकासाची ग्वाही

# ना. सुधीर मुनगंटीवार चंद्रपुरचा लोकसभा क्षेत्राचा 'मेकओव्हर' करतील-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण केला ; कधीच बनवाबनवी केली नाही- सुधीर मुनगंटीवार










**वणी । प्रतिनिधी**

संपूर्ण विश्वाने नेता मानलेले नरेंद्रजी मोदी यांचे नेतृत्व स्वीकारणे किंवा राहुल गांधींच्या नेतृत्वात २६ पक्षांच्या इंडिया आघाडीला देशाचे तुकडे करू देणे, असे दोनच पर्याय आता आपल्याकडे शिल्लक राहिले आहेत. पहिला पर्याय प्रगतीकडे नेणारा तर दुसरा अधोगतीकडे नेणारा आहे. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विकासाचा धडाका बघता ते खासदार झाल्यास चंद्रपुरचा 'मेकओव्हर' करतील, अशी खात्री आहे. मतदारांनी त्यांना कौल दिल्यास ते विजयी होतील आणि काँग्रेसला धक्का बसेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील टिळक चौक, शासकीय मैदानात आयोजित सभेत ते बोलत होते. ना. मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मतदारांना साद घातली. यावेळी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ, आमदार डॉ. संदीप धुर्वे, आमदार डॉ. अशोक उईके आमदार संजय रेड्डी बोदकुरवार, भाजपचे जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, मनसेचे राजू उंबरकर, रवी बेलूरकर, विनोद मोहितकर यांच्यासह भाजपा-शिवसेना रिपाइं, रासप महायुतीचे अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या आमदारकीच्या काळात, मंत्रिपदाच्या काळात चंद्रपूरचा कायापालट केला. विकास कामांसाठी मुनगंटीवार सतत आग्रही असतात. प्रत्येकाने किमान एकदा तरी चंद्रपूरचे बदलेले रूप पहावे. सुधीर मुनगंटीवार लोकसभेत खासदार म्हणून गेल्यास काय करू शकतील, याची त्यावरून कल्पना येते, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.आयुष्यात आपण कधीच बनवाबनवीचे राजकारण केले नाही. राजकारणात प्रवेश केला त्या दिवसापासून आपण मतदारसंघाच्या तसेच जिल्ह्याच्या प्रगतीचा विचार केला. मतदारांना जो शब्द दिला, तो पूर्ण केला. आतापर्यंत केलेल्या प्रत्येक विकास कामाचा पुरावा आपल्याकडे आहे. त्यामुळे लोकसभा निवडणूक जिंकताच वणी विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करून दाखवू, असा शब्द राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा महायुतीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला. यावेळी ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले, की व्यक्तीला साधे मोबाइल सीमकार्ड घ्यायचे असेल, तर आपण चांगली सेवा देणारी कंपनी निवडतो. मग देश चालवायचा प्रश्न असेल तेव्हा विकास करणारी पार्टीच निवडली पाहिजे. देशाचा पंतप्रधान कोण होणार, हे लहान बालकाला विचारले तरी तो नरेंद्रजी मोदीजी हेच नाव घेईल. देशात जर मोदींचे सरकार येणार असेल, तर अन्य पक्षाच्या उमेदवारांकडे बघायचेच कशाला?गेल्या दहा वर्षात नरेंद्रजी मोदी यांनी देशाचा कायापालट केला. देशाचा परिपूर्ण विकास करायचा असेल तर भाग्यरेषा नसलेला काँग्रेसचा तुटका पंजा मतदारांनी विसरावा. देशात आणि राज्यात महायुतीची सत्ता येणार आहे. अशात केवळ जातीच्या आधारावर किंवा भावनिक आधारावर मतदार बळी पडले तर मतदारसंघ मात्र माघारेल असे मुनगंटीवार म्हणाले.काँग्रेस कायम सत्तेसाठी हपापली आहे. काँग्रेसने आजपर्यंत देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या अनेक शहिदांचा अपमान केला आहे. केवळ जातीचे राजकारण केले आहे. अशात काँग्रेसला मतदान कराल तर भविष्यातील पिढी आपल्याला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. जात ही घराच्या उंबरठ्याच्या आत असते. डॉक्टर रुग्णाची जात पाहून उपचार करीत नाही. शिक्षक विद्यार्थ्याची जात पाहून शिक्षण देत नाही. हवा, पाणी, निसर्ग कोणाला जात विचारत नाही. त्यामुळे जातीच्या आधारावर मतदान करू नका, असे ना. मुनगंटीवार म्हणाले.काँग्रेसच्या खासदार, आमदारांची दहा वर्ष सत्ता होती. या दहा वर्षांत त्यांनी कोणती विकासकामे केली ? याची यादी सादर करावी. आपण केलेल्या कामाची यादीच नव्हे तर प्रत्यक्ष पुरावा आपण सादर करीत आहोत. काँग्रेसने मतदारसंघात केलेल्या २१ मोठ्या कामांची यादी दिली तरी पुरेसे आहे. काँग्रेसने विकास कामेच केली नसल्याने आता जातीचा आधारावर भावनिक साद घालावी लागत आहे, असा घणाघात ना. मुनगंटीवार यांनी केला.कार्यक्रमादरम्यान धनोजे कुणबी परिवर्तन महिला संस्थेच्या वणी अध्यक्ष संध्याताई नादेकर, रुंदाताई नागरकर आदींनी भाजपमध्ये प्रवेश घेतला. पक्षाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

**आता आम्ही दोघे आहोत!**

आमदार संजय रेड्डी यांना उद्देशून देवेंद्रजी फडणवीस म्हणाले, तुम्ही जेव्हा निधी मागितला आम्ही दिला. चिंता करू नका. पिण्याच्या पाण्याची वणीची योजना जवळपास मंजूर करून ठेवली आहे. आचारसंहिता झाली की त्यालाही निधी मिळेल. संजय रेड्डी तुम्ही एकटे नाहीत. आता एकीकडे सुधीर मुनगंटीवार आहेत आणि दुसरीकडे मी आहे. केंद्र आणि राज्य सरकार असा दोन्हींचा निधी कमी पडणार नाही ही ग्वाही देतो.

## चंद्रपूर लोकसभा क्षेत्राच्या सुरक्षित अन् उत्तम भविष्यासाठी सुधीरभाऊंना विजयी करा:सुनील शेट्टी

**भद्रावती । प्रतिनिधी**

सुधीर मुनगंटीवार यांच्यासारखा लोकनेता आपल्याला उमेदवार म्हणून लाभलेला आहे हे आपले भाग्य असून, चंद्रपूर लोकसभा क्षेत्राच्या सुरक्षित आणि उत्तम भविष्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन बॉलीवूडचे सुप्रसिद्ध अभिनेते सुनील शेट्टी यांनी केले. भद्रावती येथे आयोजित रोडशो दरम्यान ते मतदारांशी संवाद साधत होते.

चंद्रपूर-आर्णी-वणी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा -शिवसेना-राष्ट्रवादी-रिपाई महायुतीचे उमेदवार श्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ सुनील शेट्टी आज भद्रावती आणि वरोरा येथे रोड शो च्या माध्यमातून मतदारांशी संवाद साधत होते. लोकसभेची ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आणि निर्णायक असून भारताचे उज्वल भविष्य ठरविणारी आहे. यासाठी आपल्याला पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनाच बघायचे असल्यामुळे भद्रावतीच्या जनतेने भविष्याचा विचार करून सुधीर मुनगंटीवार यांनाच मतदान करावे असे आवाहनही सुनील शेट्टी यांनी केले.



या रोड शो मध्ये सुनील शेट्टी यांच्या समवेत विधानसभाप्रमुख रमेश राजूरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नितीन मते, चंद्रकांत गुंडावार, अफजल भाई, प्रशांत डाखरे, किशोर गोवारदीपे, सुनील नामोजवार,अंकुश आगलावे, प्रणिता शेंडे, लता भोयर, वंदना सिन्हा, युवराज धानोरकर, पप्पू सारवान, अर्चना आरेकर, इमरान खान, अमित गुंडावार, विशाल ठेंगणे, श्रीपाद भाकरे यांच्यासह भाजपा व महायुतीतील सर्व प्रमुख पदाधिकारी तसेच मनसेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भद्रावती येथील स्व.बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वारापासून या रोड शोला प्रारंभ झाला तर नाग मंदिरापर्यंत झालेल्या या रोड शो मध्ये सुनील शेट्टी यांचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. महिलांनी त्यांना पंचारतीने ओवाळले तर पुष्पवृष्टी देखील केली.

# ५ जूनपासून पुन्हा उपोषण सुरू मनोज जरांगेंची मुंबईत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

सरकारने मराठा समाजाला फसविण्याचे काम केले आहे. ७ महिने झाले तरी सरकारने मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. त्यामुळे आता ५ जूनला मी पुन्हा उपोषण सुरु करणार आहे, अशी घोषणा आज मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मनोज जरांगे त्यांच्या सहकाऱ्यांसह आज चैत्यभूमीवर आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. जरांगेंनी आज उपंमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली.




जरांगेंनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती आहे. त्यानिमित्त अभिवादन करण्यासाठी आम्ही आज चैत्यभूमीवर आलो होतो. आज राजकारणाशी संबंधित काहीही घोषणा होणार नाही. आमचा राजकारणासोबत काहीच संबंध नाही. आम्ही कुठे उमेदवार दिले नाहीत आणि कोणत्या उमेदवाराला पाठिंबा दिलेला नाही. ६ जूनपर्यंत आरक्षण दिले नाही, तर आम्ही विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागणार. ५ जूनला मी पुन्हा उपोषण देखील सुरु करणार आहे. सरकारने मराठा समाजाला फसविण्याचे काम केले आहे. आज आरक्षण देऊ, उद्या देऊ, असे करत ७ महिने झाले. तरी मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. मराठ्यांविषयी देवेंद्र फडणवीस यांना अतिप्रेम आहे. इतके प्रेम उफाळून येते की, त्यांचे की सांगता येत नाही. मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. सात महिन्यांआधीचे गुन्हे काढले जात आहेत. गोळ्या झाडणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला बढती दिली. त्यामुळे गृहमंत्री म्हणून शाबासकी देण्यासारखी कामगिरी आहे. त्यांनी हिंगोली लोकसभा मतदार संघातील उमरखेड येथील मराठा महिला कार्यकर्त्या सरोज देशमुख यांना तडीपार केले. महिलेला तडीपार करण्याची ही पहिलीच घटना आहे. केंद्राचा आणि आमचा काही संबंध नाही. आम्ही ओबीसीतून आरक्षण मागत आहोत, आमच्या आरक्षणाचा प्रश्न राज्यस्तरीय आहे. अशोक चव्हाण फक्त इकडून तिकडे जात आहेत. सत्तेत असल्यावर ते आरक्षण देत नाहीत. सत्तेत नसल्यावर आरक्षण देण्याच्या बाजूने बोलतात. आता सध्या त्यांचे सरकार आहे. तरीही त्यांच्या नांदेडमध्ये महिलांवर गुन्हे दाखल होत आहेत.

# टेलरच्या धडकेने कुटुंबाची वाताहात

## महिलेचा जागीच मृत्यु,३ गंभीर

**पुलगाव । प्रतिनिधी**

नागपूर पुलगाव कडे मोपेडवर येणाऱ्या एका कुटुंबाला मागून येणाऱ्या टेलरने केळापूर जवळ धडक दिल्याने एक महिला जागीच मृत्यू पावली व इतर तिघांना ग्रामिण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून सावंगी रुग्णालयात रवाना करण्यात आले.




नागपूर येथून सुमित संतोष बोरकर (वय ३०), ममता सुमित बोरकर (वय २७), वैष्णवी सुमित बोरकर (वय ३), नित्या सुमित बोरकर (वय५)राहणार नारी नागपुर नागपूरवरून पुलगावकडे मोपेड गाडी क्रमांक एम एच ४९ सी ई ५२७९ ने येत असताना केळापूर शिवारात भोयर यांच्या फार्म हाऊस जवळ मागून येणारा टेलर क्रमांक ,एम एच ०४ एच वाय ३११३ या टेलरची धडक लागल्याने ममता सुमित बोरकर यांच्या अंगावरून चाक गेले त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर सुमित, निव्या, वैष्णवी यांना उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय पुलगाव येथे आणले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना सावंगी येथे रवाना करण्यात आले. अत्यंत कमी वयातील या कुटुंबाचा अपघात झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# अधिकृत घोषणा होईपर्यंत प्रत्येक पक्षाला जागा मागण्याचा अधिकार-भुजबळ

**नाशिक**-अधिकृत घोषणा होईपर्यंत प्रत्येक पक्षाला जागा मागण्याचा अधिकार आहे असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या जागेबाबत केले आहे. महायुतीमध्ये नाशिकच्या जागेवरून तिढा कायम आहे. शिंदे गट, भाजप आणि अजित पवार गटाकडून उमेदवारांचे नाव समोर येत आहे. त्यामुळे नाशिकच्या उमेदवाराची महायुतीकडून कधी घोषणा होणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांच्याऐवजी मंत्री छगन भुजबळ यांना नाशिकमध्ये उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तर दुसरीकडे हेमंत गोडसे यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. नाशिकची जागा शिंदे गटालाच मिळणार असा वसिहवास हेमंत गोडसे यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सध्या नाशिकच्या जागेवरून महायुतीमध्ये चांगलीच रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे.



याबाबत बोलतांना छगन भुजबळ म्हणाले, ''जोपर्यंत अधिकृतरित्या जाहीर होत नाही, तोपर्यंत महायुतीच्या प्रत्येक पक्षाला ही जागा मागण्याचा अधिकार आहे. ज्यावेळी उमेदवाराचे नाव जाहीर होईल, त्यावेळी आम्ही सगळे एकत्रित काम करणार आहोत. नाशिकची निवडणूक महाराष्ट्रातील निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात आहे. त्यामुळे इतर ठिकाणी तेथील वाटाघाटी झाल्या आहेत. काही निवडणुका दोन दिवसांत आहेत. तसेच काहींचे दुसऱ्या टप्प्यातील अर्ज भरायचे सुरू आहे. त्यामुळे तेथील वाटाघाटी आणि निवडणुकीसाठी सगळ्यांचे लक्ष आहे'', असे भुजबळ यांनी सांगितले.दरम्यान, आज भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. याला मोदींची गॅरंटी असे नाव देण्यात आले आहे. यावर भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ''भाजपाने जाहीरनाम्यात काही सांगितले असेल तर ते पूर्णदेखील करतील. अनेक गोष्टींची पूर्तता त्यांनी केलेली आहे. शेतकऱ्यांना सुद्धा दरवर्षी ठराविक रक्कम पीएम किसान योजेनेतून खात्यात जाते. घरांच्या योजनेसाठी १२ हजार कोटी रुपये केंद्र सरकारने महाराष्ट्राला दिले आहेत. यानंतर राज्य सरकारनेही अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत. महायुतीचा फायदा हा भारतातील जनतेला होत आहे'', असे छगन भुजबळ म्हणाले.दरम्यान, उमेदवारीसाठी हेमंत गोडसे यांनी आज पुन्हा एकदा मुंबई गाठले आहे. नाशिकमधून उमेदवारी मिळण्यासाठी ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहेत. तर छगन भुजबळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गाठीभेटी घेतल्या आहेत. छगन भुजबळांकडून एक प्रकारे प्रचाराची सुरुवात झाल्याची चर्चा आता नाशिकमध्ये रंगू लागली आहे. यामुळे नाशिकचे राजकीय वातावरण तापल्याचे चित्र आहे.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या हिरापूर येथील शेतकरी कृष्णराव गणपतराव कुंभारे (वय ५५ वर्ष) यांनी त्यांच्यावर असलेल्या कर्जामुळे आपली जीवन यात्रा राहत्या घरी फाशी घेऊन संपवली.



आज दि.१४ ला दुपारी १२ ते १ च्या दरम्यान कृष्णराव यांनी आपल्या राहत्या घरीच गळफास लाऊन आपले जीवन संपविले.त्यांच्यावर शासकीय तसेच तसेच प्रायव्हेट बँकेचे कर्ज असल्याचे समजते, दोन मुले त्यांच्याकडे चार एकर शेती होती गारपीट व सततच्या नापिकीमुळे आर्थिक विवंचनेत होते.त्यांच्या मागे पत्नी,दोन मुले व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# कवठा रेल्वे येथे युवकाची आत्महत्या

पुलगाव - नजिकच्या कवठा रेल्वे येथे पंकज रामेश्वर वानखेडे( वय २८) याने गळफास घेऊन आत्महत्या केली.आज दि.१४ एप्रिलला दुपारच्या सुमारास पंकजने घरी फाशी घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. पुलगाव पोलीस पुढील तपास करीत आहे.पंकज च्या मागे आई-वडील, एक भाऊ आहे.पंकज हात मजुरी करीत होता. मृतदेह शवविच्छेदणासाठी ग्रामीण रुग्णालय पुलगाव येथे आणला.


# पांडवांनी एका रात्रीत बांधलेले मंदिर!

**महाराष्ट्रात देवींची साडेतीन शक्तिपीठे मानली जातात. त्यापैकी पार्वती, यमाई, रेणुका मातेचा अवतार म्हणजे एकवीरा देवी! लोणावळ्याजवळील वेहेरगाव-कार्ला गडावरील आई एकवीरा देवी ही एक आदिशक्ती असून, एक जागृत देवस्थान म्हणून तिची ख्याती आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवस्थानांमध्ये कार्ला येथील एकवीरा देवस्थानचा समावेश आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकातील शिल्पकला आणि लेणी कलेचा उत्तम नमुना म्हणजे लोणावळ्याजवळील वेहेरगाव येथील कार्ला लेणी! या लेण्यांत ऐश्वर्य असले, तरी डामडौल नाही. पुणे-मुंबई या दोन महानगरांच्या मध्यभागी विपुल निसर्गसंपदा, प्राचीन व ऐतिहासिक लेण्या व गड-किल्ले, भरपूर जलसाठा अशा विविधतेने नटलेल्या मावळ तालुक्याच्या वैभवात भर टाकणारी कार्ला लेणी व श्री एकवीरा मातेचे मंदिर आहे. सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा संकलित लेख पूर्ण वाचा... संपादक.**

सदर बौद्धकालीन प्राचीन लेणी असून १६० ख्रिस्तपूर्व सनापासून अस्तित्वात आहेत. देवीची मूर्ती स्वयंभू पाषाणाची आहे. सन १८६६ला या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे समजते. या परिसरातील देवीला वेहेरगावची यमाई, अंबामाता किंवा परशुराममाता रेणुका असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील विशेषत: मुंबई, ठाणे, रायगड, कोकण भागातील कोळी, आगरी, माळी, कुणबी, सोनार, पाठारे, चांद्रसेनीय कायस्थ, ब्राह्मण, प्रभू, चौकळशी, पाचकळशी अशा अनेक समाजांची श्री एकवीरा देवी कुलस्वामिनी असून श्रद्धास्थानही आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून एकवीरा आईची ख्याती आहे. चैत्र आणि आश्विन या दोन महिन्यांत देवीची यात्रा भरते. या दोन्ही यात्रांना कोकणातील कोळी बांधवांसह राज्यातील लाखो भाविक देवीच्या दर्शनास व नवस फेडण्यासाठी येतात. नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीच्या पूजनाचा आणि स्तवनाचा असतो. यात्राकाळात राज्याच्या विविध भागांतून कोळी बांधवांसह इतर भाविक देवीच्या दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी येतात. या देवस्थानची व्यवस्था श्री एकवीरा देवस्थान ट्रस्ट पाहते. मागील काही वर्षांपासून शिवसेनेचे माजी आमदार अनंत तरे या देवस्थानचे अध्यक्ष होते. त्यांच्या पुढाकाराने या दुर्लक्षित पर्यटन व धार्मिक स्थळाच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे. गडावर विजेची सेवा, भाविकांच्या निवासासाठी धर्मशाळा, मुबलक पाणी, परिसराचे सुशोभीकरण, पायथा ते गडापर्यंत पायऱ्यांना संरक्षक लोखंडी रेलिंगची व्यवस्था अशा विविध सुविधा उपलब्ध झाल्या असून प्रस्थानद्वाराच्या जागी नव्याने सागवान लाकडाचे सुंदर नक्षीदार प्रवेश व प्रस्थानद्वार बसविण्यात आले आहे.

एकवीरा आई तू डोंगरावरी।
नजर हाय तुझी कोल्यावरी।।

खरोखरच हे अर्थपूर्ण गाणे एकेदिवशी ऐकायला मिळाले. यापूर्वीही अनेकदा हे गाणे ऐकले होते. पण, आजचा दिवस जरा वेगळा होता. कारण, आज 'एकवीरा आई तू डोंगरावरी' या गाण्यात वर्णन केलेल्या एकवीरा आईचे मंदिर असलेल्या कार्ला, बेहेरगाव, मळवली, लोणावळा परिसरात कामानिमित्त निघाला आहात. वेळ मिळाल्यास प्रत्यक्ष देवीच्या दर्शनालाही जायचे असा बेत मनोमन केला असेल नाही का? तेव्हा तुमच्या गाडीने पिंपरी-चिंचवडमधील निगडी सोडले असेल. लोणावळ्याच्या दिशेने गाडी निघाली सुद्धा. त्यावेळी चालकाने एकवीरा आई तू डोंगरावरी... हे गाणे लावलेले असेल आणि साहजिकच तुमच्यात चर्चा सुरू झाली असेल, एकवीरा देवीबाबत. कदाचित



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

त्यांच्याही मनात देवीच्या दर्शनाला जायचा बेत असावा. समजा एक सहकारी म्हणतो, चाललोच आहोत, तर एकवीरा देवीचे दर्शन घेऊ या. पण, काही सहकाऱ्यांनी नको म्हणत आधी काम करू. ते लवकर संपले तर देवीच्या दर्शनाला जाऊ. असे सुचवेल. त्यावर सर्वांचे एकमत होईल. पण, चर्चेत एकवीरा देवी, तिचे स्थान असलेले कार्ला-बेहेरगाव डोंगर, परिसरातील लेण्या, एकवीरा देवीची महती सर्वच विषय आलेत. त्यामुळे देवीविषयी बरीच माहिती मिळेल, त्यानुसार नाही कहो?

एकवीरा देवीला एकवीरा आई असेही म्हणतात. तेच शब्द मोटार चालकाने लावलेल्या गाण्यात होते. पुणे-मुंबई महामार्गावरील लोणावळा शहरापासून जवळच कार्ला लेणी आहे. पुण्याहून जाताना लोणावळ्याच्या अगोदर कार्ला फाटा लागतो. तेथून साधारण तीन किलोमीटर अंतरावर एकवीरा देवीचे मंदिर आहे. लोकल रेल्वेने पुणे, पिंपरी-चिंचवडमधून गेल्यास मळवली रेल्वे स्थानकावर उतरून वाहनाने देवीच्या दर्शनाला जाता येते. हे साधारण पाच ते सहा किलोमीटर आहे. एकवीरा देवीच्या दर्शनासाठी कोकणातील बांधव दरवर्षी जातात. शिवाय, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ठाकरे कुटुंबीयसुद्धा देवीच्या दर्शनासाठी व पूजेसाठी येतात. देवीचे मंदिर डोंगरात असून परिसरात लेणी आहे. तिला कार्ला लेणी असे म्हटले जाते. शारदीय व शाकंभरी नवरात्रामध्ये देवीच्या दर्शनासाठी भाविकांची खूप गर्दी असते. एकवीरा देवीबाबत काही आख्यायिका अनेकांकडून ऐकायला मिळाल्या आहेत. त्यातील एक आख्यायिका महाभारताशी संबंधित आहे-

त्यानुसार पंडुराजाला पाच पुत्र होते. धर्मराज, भीम, अर्जुन, नकूल, सहदेव अशी त्यांची नावे. त्यांना पाच पांडव नावाने ओळखले जाते. ते वनवासाला निघाले होते. वनात भटकत असताना कार्ला परिसरात पोहोचले. त्यांच्या समोर प्रत्यक्ष देवी प्रकट झाली. 'या ठिकाणी माझे मंदिर बांधा' असा दृष्टांत दिला. पण, 'एका रात्रीतच मंदिर बांधायला हवे' अशी अटही घातली होती. तिचा स्वीकार करत पांडवांनी एका रात्रीत मंदिर बांधले. देवी प्रसन्न झाली. वनवासानंतर पांडवांना एक वर्ष अज्ञातवासात राहायचे होते. या काळात 'पांडवांना कोणीही ओळखू शकणार नाही,' असा एक वर देवीने पांडवांना दिला. एकवीरा देवी ही माहूरच्या रेणुका मातेचा अवतार आहे, असेही म्हटले जाते. विद्येची देवता गणपतीची आई माता पार्वती, देवी यमाई आणि रेणुका मातेचा अवतार म्हणजे एकवीरा देवी, अशीही आख्यायिका सांगितली जाते. त्यामुळे तिला वेहेरगावची यमाई, अंबामाता किंवा परशुराममाता रेणुका असेही म्हटले जाते. एकवीरा मातेची मूर्ती स्वयंभू आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून एकवीरा मातेची ख्याती आहे. चैत्र आणि आश्विन या दोन महिन्यांत देवीची यात्रा भरते. एकवीरा देवीचे मंदिर डोंगरावर आहे. सह्याद्री पर्वताच्या कुशीतील कार्ला येथील डोंगरावर मंदिर आहे. त्यामुळे पायथ्यापासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी काही पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराचा गाभारा खूप छोटा आहे. हा परिसर देवीच्या दर्शनासह पर्यटनासाठी व निसर्गसौंदर्य न्याहाळण्यासाठी उत्तम आहे. त्यामुळे येथे नेहमीच गर्दी असते. पावळ्यामध्ये तर परिसरातील सृष्टी सौंदर्य मनाला मोहवून टाकते. डोंगरावरून खळाखळत कोसळणारे धबधबे जणू दुधाच्या धारेसारखे भासतात. डोंगरांच्या कड्यांवरून ठिपकणारे पाण्याचे थेंब वेगळाच आनंद देऊन जातात. या ठिकाणापासून जवळच जगप्रसिद्ध लोणावळा व खंडाळा ही थंड हवेची ठिकाणे आहेत. भाजे लेणी आहे. लोहगडासह अन्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील अनेक ऐतिहासिक किल्ले आहेत. त्यामुळे देवदर्शनाबरोरच पर्यटनासाठीही अनेक जण या भागात येतात. एकवीरा देवीचा उत्सव शारदीय नवरात्रीच्या निमित्ताने सुरू होत आहे.

एकवीरा आई ही एक हिंदू देवता आहे. भारत आणि नेपाळ या देशांच्या निरनिराळ्या भागांमध्ये अमर ऋषी परशुरामांची आई म्हणून एकवीरा देवीची रेणुका या नावाने देखील उपासना केली जाते. एकवीरा आईचे मंदिर हे महाराष्ट्रातील लोणावळा या गावाजवळ कार्ला लेण्यांजवळ आहे. प्रामुख्याने आगरी-कोळी समाजाचे लोक येथे देवीच्या पूजेसाठी येतात. पण कोळी समाजाच्या लोकांबरोबरच एकवीरा देवीची उपासना बऱ्याच इतर समाजांतील लोकांकडून विशेषतः सीकेपी आणि दैवज्ञ ब्राह्मण यांच्याकडूनही केली जाते. तसेच काही कुणबी समाजाच्या शाखेतील लोकांचेही हे कुलदैवत आहे. या मंदिर-संकुलामध्ये एकसारख्या बांधणीची आणि एका ओळीत बांधली गेलेली मूळची तीन मंदिरे असून ती सर्व पश्चिमाभिमुख होती. यापैकी मधले आणि दक्षिणेचे मंदिर पूर्णतः सुस्थितीत असून इतर बांधकामे केवळ नकाशावरच नाममात्र अस्तित्वात आहेत, असे या मंदिराच्या वास्तूचा आढावा घेताना लक्षात येते. या तिन्ही देवळांच्या समोरच महामंडप, वर्षामंडप आणि गोपुर आहेत आणि ही तिन्ही मंदिरे मुख्य देवतेच्या परिवारातील सोळा सदस्य देवतांच्या मंदिरांनी वेढलेली आहेत. अश्विन नवरात्र किंवा शारदीय नवरात्र आणि चैत्र नवरात्रात अनेक भाविक या मंदिरात पूजा आणि उत्सव साजरा करण्यासाठी गर्दी करतात. या मंदिरामध्ये पशुबळी देखील देण्याचा रिवाज आहे. बकरी/ कोंबडी यांसह इतरही काही प्राण्यांचे बळी इथे दिले जातात. या देवीकडे चमत्कारी शक्ती आहेत, अशी भाविकांची मान्यता आहे.

पौराणिक कथेनुसार हे मंदिर पांडवांनी त्यांच्या वनवासाच्या काळामध्ये बांधले होते. एकदा पांडव या पवित्र ठिकाणी आले असताना त्यांच्यासमोर प्रत्यक्ष एकवीरा माता प्रकट झाली आणि तिने त्यांना इथे तिचे मंदिर बांधण्याचा आदेश दिला. पण तिने त्यांची परीक्षा पाहण्यासाठी एक अटही घातली की, पांडवांनी हे मंदिर एका रात्रीत बांधावे. पांडवांनीही हे मंदिर एका रात्री बांधून दाखविले. त्यामुळे त्यांची ही भक्ती पाहून देवी प्रसन्न झाली आणि वनवासानंतरच्या त्यांच्या एका वर्षाच्या अज्ञातवासात त्यांना कोणीही ओळखू शकणार नाही, असा वरही तिने पांडवांना दिला. एकवीरा देवी हा रेणुका मातेचा अवतार आहे. तथापि, कार्बन डेटिंगनुसार असे आढळते की, या मंदिराची बांधणी दोन कालखंडांमध्ये झाली आहे- इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून ते दुसऱ्या शतकापर्यंत आणि ५व्या शतकापासून ते १०व्या शतकापर्यंत. सदर मंदिर डोंगरावर आहे. मंदिरात जाण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. एकवीरा देवीचे हे मंदिर आजूबाजूच्या पुरातत्त्व विभागाद्वारे संरक्षित असलेल्या कार्ला लेण्यांनी वेढलेले आहे. मुख्य देवता एकवीरा माता तर तिच्या डावीकडे जोगेश्वरी देवी आहेत. टेकडीच्या अर्ध्या भागामध्ये देवीच्या पवित्र पायांसाठी एक मंदिर आहे. लोणावळ्यापासून ८ किमी. अंतरावर आहे. लोणावळ्यापासून ते एकवीरा मंदिरापर्यंत जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेसचा वापर करता येतो. तसेच, ऑटो रिक्षादेखील उपलब्ध आहेत सेंट्रल पॉईंट लोणावळा- शिवनेरी बस स्टॉपपासून ५ किमी. पुणे शहर (महाराष्ट्र) पासून ४९ कि.मी. मुंबईपासून ९७ कि.मी आहे.. पुणे लोणावळा मार्गावीर लोणावळ्याच्या अलीकडील मळवली रेल्वे स्टेशनपासून हे मंदिर पायी चालायच्या अंतरावर आहे. पुणे ते लोणावळा अशी लोकल रेल्वेची सेवा आहे, हे लक्षात घ्यावे.

!! श्रीएकवीरा आई यात्रोत्सवाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभकामना !!

# भाजपाचे वतीने आष्टी येथे महामानवाला अभिवादन

**तळेगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा भाजपा अनुसूचित जाती मोर्चा चे वतीने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या प्रमाणात साजरी होत असून १४ एप्रिलला आष्टी शहीद येथे भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, युवा मोर्चा व महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आली.



जुने बसस्थानक परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुतळ्याला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले .याप्रसंगी वर्धा जिल्हा महामंत्री अशोक विजयकर शहराध्यक्ष ऍड.मनीष ठोंबरे तालुका महामंत्री नरेंद्र भनेरकर,युवा मोर्चा अध्यक्ष भूषण सिंग टांक, महिला आघाडी शहर अध्यक्ष आश्लेषा सव्वालाखे, बुथ वॉरियर्स आवेज खान, गजानन होले, शक्ती केंद्रप्रमुख विजय खांडेकर, भटके विमुक्त आघाडी जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव बडगे, तालुका उपाध्यक्ष रवींद्र काळे, माजी नगरसेवक सुरेश काळबांडे, बूथ प्रमुख सुभाष निंबेकर,विजय नेरकर,शहर चिटणीस सचिन पाचघरे,शहर भाजपाचे गजानन आडे,युवराज निशिदकर,प्रज्वल हिरुडकर,अनिल अनासाने, सौरभ तायडे,शरद सावरकर, रंगरावजी कांदे सुधीर डांगे, माया काळबांडे,उषा मुंदाने, कल्पना गंद्रे,मीना वरवडे, रामटेके यांचे सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मतदान अधिकाऱ्यांची तीसरी सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीकरिता मतदान अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची तीसरी व अंतिम सरमिसळीकरणाची (रॅण्डमायझेशन) प्रक्रिया आज पूर्ण करण्यात आली. यानुसार आता जिल्ह्यातील कोणत्या मतदान केंद्रावर कोणते अधिकारी राहतील याची निश्चिती करण्यात आली.

निवडणूक निरीक्षक राहुल कुमार, जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी विवेक घोडके, नोडल अधिकारी प्रशांत शिर्के, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी एस.आर.टेंभूर्णे, जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव, प्रा. रुपेशकुमार गौर, प्रा. ए.झेड हकीम यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राष्ट्रीय सूचना केंद्रात संगणक प्रणालीद्वारे ही प्रक्रीया पूर्ण करण्यात आली.




सरमिसळ प्रक्रियेंतर्गत जिल्ह्यातील आरमोरी, गडचिरोली व अहेरी या तीन विधानसभा मतदारसंघाकरिता मतदान केंद्राध्यक्ष, सहायक केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी म्हणून ४ हजार २०१ पुरूष व ६१ महिला मतदान अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यातील १० टक्के मतदान अधिकारी राखीव राहतील. आरमोरी विधासभा मतदार संघात १३३९ पुरूष व १९ महिला, गडचिरोली क्षेत्राकरिता १५७२ पुरूष व २२ महिला तर अहेरी विधानसभा क्षेत्राकरिता १२९० पुरुष व २० महिला मतदान अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

महामानव,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रविवारी सकाळी भाजपा कार्यालयात पक्षाचे शहराध्यक्ष ओम प्रकाश राठी यांनी महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करुन आदरांजली वाहिली.यावेळी भारतीय जनता पार्टीचे समस्त नगरसेवक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.खरेदी-विक्री सह.संस्थेत उपसभापती प्रा.ए.सी.कलोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करुन पूष्पहार अर्पण केला.

संस्थेच्या संचालकांनी व गणमान्य व्यक्तींनी सुध्दा उपस्थिती दर्शवून आदरांजली अर्पण केली.

स्थानिक विविध कार्य.सहकारी संस्थेत मोहन अंभोरे यांनी महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करुन आदरांजली वाहिली.यावेळी अजय कलोडे,सुधाकर सोनटक्के,श्रावण झाडे,धनराज झिलपे आदी संचालक हजर होते.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती काँग्रेस कार्यालयात साजरी



**सावली । प्रतिनिधी**

सावली तालुका काँग्रेस कमिटीतर्फे ज्ञानसागर विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती जनसंपर्क कार्यालय सावली तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील फोटोला व रमाबाई आंबेडकर विद्यालय सावली येथी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या पूर्णकृती पुतळ्याला येथे पुष्पहार व फुले अर्पण करून महामानवास अभिवादन करण्यात आले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले.

ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' म्हणतात.त्यांची जयंती जगभरातील १५२ च्या वर देशात साजरी केली जाते.आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतेवेळेस सावली शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विजय मुत्यालवार,सावलीच्या नगराध्यक्ष लता लाकडे,उपगराध्यक्ष संदीप पुण्यपकर,माजी सभापती प.स.सावली विजय कोरेवार,युवा शहर अध्यक्ष अमर कोनपत्तिवार,जेष्ठ काँग्रेस पदाधिकारी प्रशांत राईचंवार,दिलीप शेंडे,माजी उपनगराध्यक्ष भोगेश्वर मोहुर्ले, नगरसेवक प्रितम गेडाम,अंतबोध बोरकर,नितेश रस्से,प्रफुल वाळके,सचिन संगीडवार,गुणवंत सुरमवार,नगरसेविका साधना वाढई,सीमा संतोषवार,ज्योती शिंदे, ज्योती गेडाम, प्रियंका रामटेके,अंजली देवगडे,राधा ताटकोंडवार,माजी ग्रा.सदस्या कविता मुत्यालवार,शिला गुरुनुले,आकाश खोब्रागडे,निखिल दुधे,गुलाब गेडाम, जनसंपर्क कार्यालय प्रमुख कमलेश गेडाम,सुनील ढोले तसेच काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ जयंती साजरी



**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत प्रत्येक रविवारी चालत असलेल्या शालेय संगणक साक्षरता अभियान गाव चिरादेवीचा आजचा शेवटचा दिवस आणि आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती, त्या अनुषंगाने दर रविवारी सुरू असलेल्या अभियानादरम्यान आज जिल्हा परिषद शाळा चिरादेवी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी मुख्याध्यापक आणि सदर उपक्रमात संस्थेतील सोनल उमाटे, अंकित तोडे, सागर निरंजने, मनोज पेटकर, दीपक कावटे, हर्षदा हिरादेवे, प्राप्ती देवगडे, लीना उराडे, पंकज खामनकर व इतर सदस्य उपस्थित होते. सर्व हेल्पिंग हँड्स टीम उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# महादेव जानकरांची बंडू जाधवांना खुली धमकी

**परभणी | प्रतिनिधी**

मी हिंदकेसरी बरोबर लढाई लढली आहे. शरद पवार साहेब, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण यांच्या विरोधात मी निवडणूक लढलेलो आहे. नांदेड, सांगली, माढा, बारामतीत निवडणुकीला उभा राहिलो आणि गुलाल लावून घ्यायला परभणीला आलेलो आहे. मी काशीराम यांच्यासोबत सात वर्षे फिरलो आहे. व्ही पी सिंग, अर्जुन सिंग यांच्यासोबत मी फिरलेलो आहे. मला उपरा आणि परका म्हणू नको. बंडू जाधव तू फार छोटा माणूस आहेस, माझ्या नादाला लागू नकोस, फार अवघड आहे होईल, अशी थेट धमकीच महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी संजय जाधव यांना दिली आहे.

महायुतीचे उमेदवार महादेव जानकर हे आज परभणीच्या पूर्णा तालुक्यात गावोगावी प्रचार करत ग्रामस्थांच्या भेटी घेत होते. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संबोधित करताना बंडू जाधव यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. त्यांच्यासोबत आमदार रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर यांच्यासह अन्य महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.विरोधकांनी माझ्या विरोधात जातीवाचक टीका करू नये. कारण महात्मा फुले यांनी गुलामगिरी या पुस्तकामध्ये आधीच लिहून ठेवले आहे की माळी, मराठा, धनगर ही एकाच आईची मुले आहेत. शाहू महाराज राजा असताना होळकरांच्या घरी पुतळाबाई म्हणून धनगरांच्या घरी पहिली मुलगी दिली आणि धनगर मराठा पहिला विवाह केला. आज आमच्यात जातीवाद केला जात आहे पण मी विरोधकांना सांगतो की तुम्ही कितीही जातीवाद करा जोपर्यंत विटेकर-लोणीकर-बोर्डीकर हे मराठा माझ्यासोबत आहेत, त्यामुळे माझा विजय अडीच लाख मतांच्या फरकाने होणार असल्याचे महादेव जानकर म्हणाले.विरोधक आता मराठा आणि ओबीसी मुद्दा काढतील पण मी सांगेन की मी परभणी लोकसभा मतदारसंघातील ७० टक्के मराठा समाजाचे मतदान घेणार आहे. विरोधक मला बाहेरचा, उपरा म्हणतात पण बंडू जाधव तुम्ही पण लातूर जिल्ह्यातले अहमदपूरचे आहेत. माझ्या राष्ट्रीय समाज पक्षाचा पहिला आमदार हा अहमदपूरमधूनच निवडून आलेला आहे. चार जूनला मी निवडून आल्यानंतर गावोगावी विजयाचा फेटा बांधून घेण्यासाठी येईल आणि येताना सोबत जिल्ह्याचा कलेक्टर आणि पोलीस अधीक्षक घेऊन येईन. गावातील जे प्रश्न आहेत ते गावातच त्याच ठिकाणी मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जानकार म्हणाले.



# सेलूत सन्मान कर्तृत्वाचा सन्मान सोहळा संपन्न

**सेलू | प्रतिनिधी**

सेलू येथील कै. आण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे अध्यक्ष अशोक नाना काकडे यांच्या वतीने सन्मान कर्तृत्वाचा वर्ष ३ रे या सोहळ्याचे आयोजन शनिवारी (दि. १३) सायंकाळी ६ वाजता साई नाटयगृहात करण्यात आले होते.

सेलू तालुका हे मराठवाड्यातील सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाणारे शहर आहे. अशा या सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या तालुक्याने समाजामध्ये अनेक हिरे घडवले आणि आशा बहुमूल्य व्यक्तींचा सत्कार म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमात गौरव करण्यात आलेल्या व्यक्ती सोबत त्यांच्या परिवारांचा सुद्धा गौरव करण्यात आला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. विजय भांबळे प्रमुख पाहुणे कवी इंद्रजीत भालेराव, पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता प्रसाद लांब, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, उद्योजक रामप्रसाद घोडके, अशोक नाना काकडे,संतोष कुलकर्णी, अशोक वाडकर, गोपाळ काबरा, प्रल्हाद कान्हेकर, दत्तात्रय(नाना) पावडे व सेलू तील प्रतिष्ठित मान्यवर मंडळी यावेळी उपस्थित होते. या समारंभात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या तालुक्यातील व्यक्तींचा सन्मान करण्यात आला तसेच माजी नगराध्यक्ष हेमंतराव आडळकर यांचाही विशेष गौरव करून सन्मानितकरण्यात आले . याप्रसंगी डॉ. विरेंद्र नागोरी, सर्जेराव लहाने, नथुराम अंभोरे, वसंतराव डासाळकर, डी.डी. सोन्नेकर, प्रा. संजय पिंपळगावकर, शफीक अली खान, सोमेश्वर गिराम, रमेश माने, मोहन बोराडे, पुजा तोडकर, अ‍ॅड. सुनिता ढोले, सुप्रिया सोन्नेकर, राजेश धापसे, कलीमभाई बेलदार, नारायण काकडे यांचा कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन बोराडे यांनी केले व तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वरूप अशोक उफाडे यांनी व्यक्त केले.




# बार्टीकडून डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामान्य ज्ञान परीक्षा संपन्न

**वसमत | प्रतिनिधी**

सम्राट कॉलनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे सामाजिक न्याय विशेष सहाय विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे गुरुनाथ गाडेकर सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली .अध्यक्षस्थानी एस बी आय बँकेचे मॅनेजर दीपक भिसे हे होते प्रमुख पाहुणे कपिल ओवे ,महेंद्र जाधव, केरबाजी दातार ,रत्नदीप कोल्हे ,शंकर ठोके ,देवानंद सोनाळे ,दीपक भिसे विजय दातार. या परीक्षेचे आयोजन जयंती मंडळांनी केले..डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती हवी या उद्देश डोळ्यासमोर ठेवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रावर आधारित सामाजिक कार्य बहुपर्यायी सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली या परीक्षेत अनेक शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला सूत्रसंचालन विजय दातार यांनी केले.आभार प्रदर्शन रत्नदीप कोल्हे यांनी केले.



# राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित वृत्तीने कार्य केले पाहिजे-डॉ.राजेश इंगोले

## राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव ; भव्य मिरवणूकीचे आयोजन



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त या दोन्ही राष्ट्रपुरूषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक अंबाजोगाई येथे काढण्यात आली. या संयुक्त जयंती महोत्सवाचे हे तिसरे वर्ष होते अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष नितीन सरवदे, सचिव धम्मपाल मोरे यांनी दिली.

यावेळी मोठ्या उत्साहात सांस्कृतिक पद्धतीने विविध कला गुणांचे सादरीकरण करीत ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीची सुरूवात संयुक्त जयंती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक विभागाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व जयंती महोत्सवाचे समन्वयक विकास अधिकारी ईश्वरअण्णा जोगदंड यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले यांनी महापुरूष हे सर्वांनी अभ्यासून समजून घेऊन जीवनात आपले आचरण आणि व्यवहार त्याप्रमाणे घडवून घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करीत महापुरूषांचे विचार स्विकारून त्या मौलिक विचारांचे वारसदार होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. समाजातील काहींनी तसेच राजकीय व्यवस्थेने महापुरूषांना पद्धतशीरपणे जाती-जातीत वाटून त्याचा वापर आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी केला. हा धोका ओळखून आता तरी समाजाने एकत्र येऊन राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित वृत्तीने कार्य केले पाहिजे असे म्हणत जयंती यांस महामानवांची प्रतीके समजून त्या साजऱ्या झाल्या पाहिजेत असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. यावेळी अनेक महिला, युवती, विद्यार्थी आणि युवकांनी विविध सांस्कृतिक कलागुणांचे अप्रतिम सादारीकरण करीत उपस्थित जनसमुदायाची उत्स्फूर्त दाद मिळवली. मुलींची पारंपरिक लेझीम, काठी, नृत्याविष्काराणे उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. जयंती मिरवणूक यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव संयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रवर्तक डॉ.राजेश इंगोले, समन्वयक ईश्वर अण्णा जोगदंड, अध्यक्ष नितिन सरवदे, महिला पथक अध्यक्ष सुषमाताई वाघमारे, भावनाताई कांबळे, सचिव धम्मा मोरे , उपाध्यक्ष गोविंद मस्के, सहसचिव सुनिल कांबळे , अभिलाष बनसोडे, प्रशांत वेडे, कोंडिबा मोरे, ब्रिजेश इंगळे, लखन वैद्य, लक्ष्मण कसबे, समीर वेडे, अजय गोरे, शुभम मस्के, शाम सरवदे, विशाल कांबळे, प्रणित वाघमारे, राहूल सुरवसे, स्वप्निल सोनवणे, प्रकाश भालेराव, आकाश शिंदे, विशाल वेडे, शार्दुल वाघमारे, विकास वेडे, सरगम मस्के, मंगेश वैद्य, भैय्यासाहेब वेडे, अनिल कांबळे, दिपक पोटभरे, उज्ज्वल सोनवणे व इतर सदस्यांनी प्रयत्न करत हा उत्सव पार पाडला. या महोत्सवाचे थेट प्रक्षेपण ओन्ली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यु-ट्यूब चॅनेलचे सुनिल रोडे यांनी केले. जयंती उत्सव मिरवणुकीत ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# विस हजार वह्यांच्या माध्यमातून साकारण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे भव्य अनावरण

**गेवराई | प्रतिनिधी**

भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून युवानेते रणवीरसिंह अमरसिंह पंडित यांनी फुले- शाहु- आंबेडकरांचा विचार समाजात पेरण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन प्रा. सुनिल मगरे यांनी केले. महापुरुषांचे आगळे-वेगळे जयंती महोत्सव घेऊन शिवछत्र परिवाराने सामाजिक सलोखा राखण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन कल्याण आखाडे यांनी केले तर भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून भव्यता नव्हे तर महात्म्यांचा विचारांची दिव्यता पुढे आली आहे, असे प्रतिपादन लोकपत्रकार भागवत तावरे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा साकारण्यासाठी वापरलेल्या विस हजार वह्या गरजू विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळवून देतील, असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. युवानेते रणवीरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई येथे आयोजित केलेल्या भिमज्योती महोत्सवात विस हजार वह्यांच्या माध्यमातून साकारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य अनावरण करताना ते बोलत होते.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या भिमज्योती महोत्सवात शनिवार, दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर विस हजार वह्यांच्या माध्यमातून साकारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अनावरण मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभागचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनिल मगरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, पत्रकार दत्ता देशमुख, भागवत तावरे, व्यंकटेश वैष्णव, उदय नागरगोजे, महोत्सव समितीचे अध्यक्ष रणवीरसिंह पंडित यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना समितीचे अध्यक्ष रणवीरसिंह पंडित म्हणाले की, भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा आठ दिवस जागर झाला आहे. महोत्सवात व्याख्यान, रक्तदान शिबीर, रुग्णांना मोफत फळे वाटप, वृक्षारोपण आदी उपक्रम राबविले. विस हजार वह्यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा साकारण्यात आली, यातूनच बाबासाहेबांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी या सर्व वह्या गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.आपले विचार व्यक्त करताना लोकपत्रकार भागवत तावरे म्हणाले की, भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून रणवीरसिंह पंडित यांनी महोत्सवाची भव्यता नव्हे तर महात्म्यांचा दिव्य विचार समाजापुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा महोत्सव बाबासाहेबांचा आचार आणि विचारांना समर्पित आहे. जात-पात-धर्म-गट याच्या पलीकडे जाऊन माणसे जोडण्याचे काम शिवछत्र परिवाराने केले आहे, त्यांना आपण सहकार्य केले पाहिजे. शिवछत्र परिवाराने सामाजिक अभिसरण करून छोटे-छोटे माणसं मोठ्या मोठ्या पदावर नेण्याचे महत्त्वपूर्ण काम केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांची जयंती आचारातून आणि विचारातून साकार करण्याचे माझ्या दृष्टीने महाराष्ट्रातील हे पहिले काम आहे, असे सांगून रचनात्मक काम करण्याची धमक शिवछत्र परिवारात आहे. एक व्हिजन असलेले नेतृत्व म्हणून रणवीरसिंह पंडित यांच्याकडे आपल्याला पाहावे लागेल. अमरसिंह पंडित यांनी आपल्या चिरंजीवाला सामाजिक कामात झोकून दिल्याचे सांगून, अशा नेतृत्वाची आज गरज असल्याचे यावेळी ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना पत्रकार व्यंकटेश वैष्णव म्हणाले की, क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून रणवीरसिंह पंडित यांनी वाड्या, वस्ती, तांडे आणि ग्रामीण भागातील पोरं पोरी क्रीडा क्षेत्रात उभा करण्याचे विधायक काम केले आहे. भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचा विचार पुढच्या पिढीला देण्याचे काम त्यांनी केलेले आहे. जाती अंताचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारला, तो पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. हा विचार घेऊनच रणवीरसिंह पंडित यांनी हा उपक्रम घेतला आहे, असेही ते यावेळी म्हणाले.आपल्या भाषणात प्रा. सुनील मगरे म्हणाले की, भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून रणवीरसिंह पंडित आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी फुले - शाहू - आंबेडकर यांचे विचार आचरणात आणण्याचे काम केले आहे, त्यामुळेच गेवराईच्या मातीतील बहुजनांशी शिवछत्र परिवाराचे घट्ट नाते आहे. अमरसिंह पंडित यांचे सुपुत्र रणवीरसिंह पंडित यांनी वीस हजार वह्यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांची प्रतिमा साकारून महाराष्ट्राचे लक्ष वेधले आहे, असे सांगून मगरे यांनी यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची सविस्तर माहिती दिली.

याप्रसंगी बोलताना सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याण आखाडे म्हणाले की, वेगवेगळे जयंती महोत्सव घेऊन शिवछत्र परिवार सदैव सामाजिक सलोखा राखण्याचे काम करत आहे. भिमज्योती महोत्सवाच्या माध्यमातून रणवीरसिंह पंडित यांनी एक आगळीवेगळी जयंती साजरी केली आहे, त्यामुळे महाराष्ट्रात चांगले संकेत गेले आहेत. फुले- शाहू-आंबेडकरांच्या विचारांना अभिप्रेत असलेला कार्यक्रम या महोत्सवात रणवीरसिंह पंडित यांनी घेतला आहे. भिमज्योती महोत्सव दिशादर्शक व आदर्श आहे. यातील उपक्रम समाजाला उपयुक्त ठरणार आहेत. डॉ. बाबासाहेबांचा सच्चा अनुयायी मला रणवीरसिंह पंडित यांच्यामध्ये दिसतो, असे सांगून आपल्या भागातील माणूस मोठा व्हावा पुढे जावा ही त्यांची आदर्श भावना आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून महात्म्यांच्या विचारांचे अनुकरण करणे, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर आपण चालले पाहिजे, हीच खऱ्या अर्थाने जयंती आहे, असे ते यावेळी म्हणाले.आपल्या भाषणात बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाजाला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने फुले शाहू आंबेडकरांचा विचार पुढे नेण्याचे काम रणवीरसिंह आणि त्याचे सहकारी करत आहेत. डॉ. बाबासाहेबांचे संविधान आता सर्वांना समजून सांगणे गरजेचे बनले आहे. आपले अधिकार आणि कर्तव्य आपल्याला कळायला हवेत. महोत्सवाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा विस हजार वह्यांच्या साह्याने गेवराईचे भूमिपुत्र उद्देश पघळ यांच्या संकल्पनेतून साकार झालेली आहे. या वह्या गरजूंना वाटप केल्या जातील आणि त्यातूनच त्या विद्यार्थ्यांना शिकण्याचे आणि पुढे जाण्याचे बळ मिळेल, असेही ते यावेळी म्हणाले या कार्यक्रमाला जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सभापती मुजीब पठाण, माजी सभापती जगन पाटील काळे, जगन्नाथ शिंदे, संचालक श्रीराम आरगडे, जि.प. सदस्य फुलचंद बोरकर, ऋषिकेश बेदरे, मयुर सोनवणे, मयुर वैद्य यांच्यासह महोत्सव समितीचे किशोर कांडेकर, धम्मा सौंदरमल, महेश सौंदरमल, धम्मा भोले, प्रभाकर पिसाळ, शाम येवले, दादासाहेब चौधरी, प्रथमेश वाव्हळ, दत्ता जाधव, स्वप्निल खांडेकर, मुक्ताराम आव्हाड, आनंद सरपते, अमोल वैद्य, अक्षय पवार यांच्यासह भिमज्योती महोत्सवाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे अनावरण झाल्यानंतर गेवराई शहर आणि परिसरातील नागरिकांनी ही भव्य प्रतिमा पाहण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. या उपक्रमाला शहर व परिसरातुन उस्फुर्त प्रतिसाद

# अन्नातून दीडशे जणांना विषबाधा
# ८० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील माजरी येथील माता महाकाली मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाच्या अन्नातून दीडशे जणांना विषबाधा झाली असून त्यातील एका ८० वर्षीय गुरुफेक शिवनाथ यादव व्यक्तीचा मृत्यू झाला.दीडशे जणांवर भद्रावती, वरोरा, माजरी ग्रामीण रूग्णालय, माजरी कॉलरी हॉस्पीटलमध्ये उपचार सुरू आहे. या प्रकरणात कार्यक्रमाचे आयोजक व स्वयंपाक तयार करणाऱ्या एका महिलेला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

भद्रावती तालुक्यातील माजरी येथील माजरी येथील न्यू हाउसिंग एरिया, महाकाली माता मंदिरात गुल्लूराम दर्शनराम यांचेकडून १३ एप्रिल रोज शनिवार ला सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाच्या कार्यक्रमात माजरी, माजरी कॉलरी, लगतच्या कॉलनीमधील शेकडों नागरिक सहभागी झाले होते. रात्री १०.३० वाजेपर्यंत महाप्रसादाचा लाभ नागरिकांनी घेतला. त्यानंतर १४ एप्रिल रोज रविवारला पहाटे पासून शेकडो नागरिकांना उलट्या, संडास व पोटदुखी सुरू त्रास जाणवायला लागला. त्यामुळे तात्काळ मिळेल त्या साधनांनी बाधीत रूग्णांना माजरी, वरोरा व भद्रावती येथील आरोग्य केंद्रात उपचारार्थ दाखल करण्यात आले. पहाटेच्या सुमारास गुरुफेक शिवनाथ यादव (वय ८०) वृद्धाचा मृत्यू झाला. तर सुमारे दीडशे रुग्णांना माजरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय वरोरा व भद्रावती येथील ग्रामीण



रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.सदर घटनेची माहिती होताच वरोरा उपजिल्हा रुग्णालयात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी भेट देऊन रुग्णांच्या प्रकृतीची परिस्थिती जाणून घेतली. उचार घेत असलेल्या रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.या रूग्णांना महाप्रसादातील भोजनातून विषबाधा झाली असावी असा प्राथमिक अंदाज आरोग्य विभागाने वर्तविला आहे. रविवारी सकाळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अशोक कराटे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर महादेव चिंचोले, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर संजय आसुटकर, वरोरा येथील डॉक्टर खुजे आदींनी रुग्णांवर उपचार सुरू असलेल्या रूग्णालया भेट घेतली. घटनेची माहिती जाणून घेतली. अन्न व पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.

**माजरी येथील विषबाधा झालेल्या व्यक्तींच्या दु:खात मी सहभागी : ना. सुधीर मुनगंटीवार**

राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मृत व्यक्तीच्या परिवाराच्या दु:खात सहभागी असल्याचे म्हटले आहे. त्यांना यथायोग्य शासकीय मदत मिळावी, यासाठी व रुग्णालयात भरती रुग्णांना उत्तम उपचार मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनाला ना. मुनगंटीवार यांनी निर्देशही दिले आहेत.

## वणी येथील धनोजे कुणबी समाज संघटना, रजनीकांत बोरले मित्र मंडळ आणि प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टीचा सुधीर मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा

## चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत ना.मुनगंटीवार यांची प्रचारात आघाडी

**यवतमाळ । प्रतिनिधी**

वणी येथील धनोजे कुणबी समाज संघटना,आणि रजनीकांत बोरले मित्र मंडळ या दोन्ही सामाजिक संघटनेसह प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टीने चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी कॉँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांना जाहीर पाठींबा दिला आहे. लोकसभा निवडणूक पार्श्वभूमीवर ना. मुनगंटीवार यांनी काल पांढरकवडा वणी तालुक्यांना भेटी देत अनेक संघटनांशी संवाद साधला. यावेळी धनोजे कुणबी समाज संघटनेच्या पदाधिकारी मंडळींनी त्यांची भेट घेतली. उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये पक्ष प्रवेश करून आपला जाहीर पाठींबा दिला. याप्रसंगी त्यांच्या गळ्यात भाजपचा दुपट्टा गळ्यात घालून सर्वांचे स्वागत करण्यात आले. यामध्ये संध्या नांदेकर, रुंदा नगरकर, रुंदा केचे, स्वप्ना बोंडे, स्नेहा झाडे, एकटा झाडे, सुचिता आसेकर, सोमा गाडगे, नीता तिवारी यांच्यासह अनेकांनी पक्ष प्रवेश केला आहे. तर मागील अनेक वर्षांपासून वणी येथे सामाजिक कार्य करीत असलेल्या रजनीकांत बोरले मित्र मंडळ कार्यरत आहे. अनाथ मुलींचे लग्न लावने, वृद्धाश्रमला मदत करने, गोर, गरीब, वंचित समाजातील घटकांसाठी दिवसरात्र मेहनत करून त्यांना न्याय मिळवून देणे यासारखी विविध कामे हि संघटना करीत आहे. या संघटनेचे प्रमुख रजनीकांत बोरले आणि त्यांच्यासर्व कार्यकर्त्यांनी ना. मुनगंटीवार यांना पाठींबा देत जास्तीत जास्त मतांनी निवडून देण्याचा संकल्प केला आहे. यावेळी आ. डॉ. संदीप धुर्वे, आ. प्रा. अशोक उईके, शंकरराव बडे डॉ. अंगाईतकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. त्याचसोबत प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टीने लोकसभा उमेदवार ना. मुनगंटीवार यांनी जाहीर पाठींबा दिला आहे. याप्रसंगी प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टीचे विदर्भ अध्यक्ष रेवनाथ वालदे, विदर्भ सचिव राकेश निमसरकारी, जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मेसरे, अखिल गेडाम, जिवन निमगडे, जितेंद्र करमनकर, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. वणी, झरी, पांढरकवडा, मारेगाव आदी तालुक्यातील भाजपा केमिस्ट फार्मासिस्ट प्रकोष्टतर्फे स्नेह मिलन सोहळा आयोजित करून ना. मुनगंटीवार यांना लोकसभा निवडणुकीत निवडून देण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी ना. मुनगंटीवार यांनी केमिस्ट फार्मासिस्ट प्रकोष्टच्या अडचणी सोडविण्यास आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रदेश संयोजक श्रीकांत दुबे, मुकुंद दुबे, आ. डॉ. संदीप धुर्वे, आ. प्रा. अशोक उईके, भाजपा जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोरडे, रवी येरणे, लक्ष्मण उरकुडे, शंकर नागदेव, बाबाराव बोबडे, धनंजय जोशी यांच्यासह अनेक प्रतिनिधी उपस्थित होते.

## बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालित बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद बोलीवार प्राचार्य बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल, तसेच या कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून शाळेच्या दुर्गा कोटगले विभाग प्रमुख ,तोशी जयस्वाल सांस्कृतिक प्रमुख, शारदा कोटगले प्री प्रायमरी विभाग प्रमुख मंचावर उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला शाळेचे प्राचार्य तसेच मंचावर उपस्थित प्रमुख पाहुणे यांनी दीपप्रज्वलन आणि मल्यार्पण केले तसेच विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकत आपले मनोगत व्यक्त केले.

शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार यांनी डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर विविध घटकाची माहिती देऊन विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिना सय्यद सहाय्यक शिक्षिका यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिरिषा मेडपल्लीवार सहाय्यक शिक्षिका यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सांगता वंदे मातरम या गीताने करण्यात आली.

## शंभराहून अधिक ग्रामस्थांनी घेतला रोगनिदान शिबिराचा लाभ

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील गिरगांव येथील सामाजिक कार्यकर्ते कुंदन सतीश खोब्रागडे यांच्या संकल्पनेतुन क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त क्रिया फाऊंडेशन गिरगांव जि. चंद्रपूर द्वारा आयोजित भव्य रक्तदान, रोगनिदान आणि मोफत औषधोपचार शिबिरामध्ये शंभराहून अधिक ग्रामवासियांनी बी.पी., शुगर आणि रक्ताच्या विविध चाचण्या करीत लाभ घेतला. आवश्यक असलेल्या रुग्णांना मोफत औषधोपचार करण्यात आले. तसेच २० ते २५ स्वयंसेवकांनी स्वेच्छेने रक्तदान करीत तरुणांपुढे समाजसेवेचा आदर्श ठेवण्याचा प्रयत्न केला.

या शिबिराची सुरुवात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून करण्यात आली. या शिबिरामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूरची रक्तपेढी बोलविली होती. या कार्यक्रमाला उद्घाटक डॉ. प्रतिक गेडाम चंद्रपूर, डॉ. नकुल बाढे चंद्रपूर, अध्यक्ष म्हणून डॉ. दीपक भामरे सी एच ओ प्रा. आ. केंद्र गिरगांव, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अमोल जिद्देवार, विकास गोंडाने, सदस्य ग्रा. पं. गिरगांव, राकेश खोब्रागडे माजी सदस्य ग्रा. पं. गिरगांव, अमोल रामटेके, डॉ. अतिशय कांबळे आरोग्यसेवक, अभिलाष कुकडे, सुखदेव चांदेकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन शाखा गिरगांव चे अध्यक्ष चंदन खोब्रागडे, क्रिया फाउंडेशनचे सहसचिव आशिक सतीश खोब्रागडे, उपाध्यक्ष प्रमोद डोंगरे, सदस्य चंद्रशेखर बारसागडे, वासुदेव सोनवाणे, साहिल खोब्रागडे,राजेंद्र बोरकर, सागर खोब्रागडे, विनोद रामटेके, हरिश्चंद्र खोब्रागडे, गुंफा खोब्रागडे महिला कार्याध्यक्षा, सुरेखा खोब्रागडे, विद्या खोब्रागडे, साधना खोब्रागडे, प्रज्ञा खोब्रागडे, सपना खोब्रागडे, सुकेषणी बारसागडे, मनी बन्सोड, व इतर सभासदांनी परिश्रम घेतले. या शिबिराला डॉ. नाना के. मेश्राम ब्रम्हपुरी, डॉ. नंदुजी खोब्रागडे ब्रम्हपुरी, डॉ. धनंजय ठीकरे, डॉ. विद्याधर राऊत ब्रम्हपुरी, डॉ. जीवन तलमले मिंथुर, डॉ. सोमेश्वर सहारे तळोधी, यांनी कार्यक्रमस्थळी सदिच्छाभेट दिली. सर्वतोपरी पोषक अश्या कार्यक्रमाचे आयोजन गावामध्ये केल्याने क्रिया फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष कुंदन सतीश खोब्रागडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आर.के .हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती

**पुलगाव । प्रतिनिधी**

आज १४ एप्रिल २०२४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शारदा सभागृहामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य संजय सहारे, प्रमुख अतिथी म्हणून मुख्य समन्वयक नरसिंग जाधव, उपमुख्याध्यापिका माया वंडलकर, उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश इंगळे, लालबहादूर यादव ,आर. के. ज्ञानमंदिरच्या प्रभारी मुख्याध्यापिका प्रीती बिडकर, ज्युनिअर कॉलेज अंशतः अनुदानित चे प्रमुख जितेंद्र वर्मा व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. अतिथींच्या स्वागतानंतर वर्ग आठवीची कु. ऋतुजा टाले हिने स्वागत गीत सादर केले. आर. के .ज्ञानमंदिरांच्या कु. श्रद्धा दुबे हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. वर्ग सातवी ची कु. माही पवार हिने भीम गीत सादर केले. आर .के. ज्ञानमंदिरांच्या सुप्रिया वासनिक यांनी आपल्या





गायनातून डॉ.आंबेडकर यांची यथोचित प्रशंसा केली. मंचावर उपस्थित सर्वच मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले.कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश पाटील यांनी ग्रंथालयाला आकर्षक असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो भेट दिले. तंत्रस्नेही कर्मचारी सुशील बांगर यांनी शाळेला संविधानाची प्रत भेट दिली. अध्यक्षीय भाषणानंतर मतदार जनजागृती अंतर्गत मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मंदा तरंगे यांनी केले तर ,सांस्कृतिक विभागातील रूपाली मस्के तसेच मंजू परिहार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता ज्येष्ठ शिक्षक आनंद जीवने , अमित उमरे , प्रकाश पाटील , सचिन नंदेश्वर , सुशील बांगर , सौ.प्रियदर्शनी उमरे , कु. राजश्री वैरागडे , गणेश शर्मा , चंदू डोंगरे ,निलेश अलोने , प्रफुल कास्टे ,रमेश कास्टे , गजू गावंडे, प्रफुल पुण्यवंतवार ,गजानन बहादुरकर ,राजू भगत आदींनी अथक प्रयत्न करून महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाची सांगता सर्वांना अल्पोहार वाटप करून करण्यात आली. या कार्यक्रमाला पूर्व माध्यमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व आर .के . ज्ञानमंदिरम् चे सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी बंधू- भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकरांचे विचार कृतीत उतरविण्याची गरज-डॉ.बोकारे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे भारतातील प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक समाज घटकांसाठी राहिलेले आहे. डॉ.आंबेडकरांनी या देशाला घटना दिली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुलतत्वे दिली. त्यांनी विविध विषयावर विचार मांडले असून त्यांचे समग्र विचार कृतीत उतरविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख प्रा.दिलीप बारसागडे उपस्थित होते. तसेच वित्त व लेखा अधिकारी भास्कर पठारे, उपकुलसचिव कामाजी देशमुख, सहायक कुलसचिव देवेन्द्र मेश्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे समन्वयक डॉ. धनराज पाटील आदी उपस्थित होते.कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे सर्व समाजाने परीक्षण करण्याची गरज आहे. आपल्या वाणीमध्ये, विचारांमध्ये डॉ. आंबेडकर आहेत. मात्र, आपल्या करणीत डॉ. आंबेडकर आहेत का? याचा प्रत्येक भारतीयाने विचार केला पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी या देशाला घटना दिली, स्वातंत्र्य, समता आणि बंधूंचा ही तत्वे दिली. यापूर्वी फ्रेंच राज्यक्रांतीने ही तत्वे दिली होती. या तत्त्वाचा खऱ्या अर्थाने दस्तऐवजीकरण आणि समाजामध्ये त्या तत्त्वांना प्रेषित करणे, समाज त्या तत्त्वावर चालविण्यास भाग पाडणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. हे डॉ. आंबेडकरांचे भारतीय समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे योगदान असल्याचे कुलगुरू डॉ. बोकारे म्हणाले.प्र-कुलगुरु डॉ. कावळे म्हणाले, डॉ.आंबेडकरांनी आयुष्यभर समाजातील वंचित, शोषित, पीडित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. देशाला गुलामगिरीतून बाहेर काढले. त्यांचे राहिलेले अपुर्ण कार्य आपल्याला पुर्ण करण्याची आवश्यकता आहे. बाबासाहेबांनी देशाला संविधान दिले. त्यामुळे भारताची लोकशाही आजही बळकट आहे. त्यांच्या जयंतीनिमीत्त महामानवाने केलेल्या कार्याला ऊजाळा देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.प्रास्ताविकेत बोलतांना, प्रा.दिलीप बारसागडे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे सर्वव्यापी असून समाजातील शेवटच्या घटकातील तळागाळातील लोकांसाठी होते. त्यांनी वंचित व शोषितांना न्याय देण्याचे कार्य केले. समता मुलक समाजाची निर्मिती करण्यासाठी बाबासाहेबांचे आयुष्य गेले. बाबासाहेबांच्या विचाराचा जागर करणे महत्त्वाचे असून त्यांचे विचार कृतीतून उतरवण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे प्रमुख दिलीप बारसागडे यांनी केले. तर आभार डॉ. धनराज पाटील यांनी मानले.

प्रारंभी कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. निळकंठ नरवाडे, डॉ.अनंता गावंडे, प्रा.रोहित कांबळे, प्रा.विकास चित्ते, प्रा.अमोल चव्हाण, प्रा.अतुल गावस्कर, तसेच प्रशांत पुनवटकर, रंजीत रायपूरे, योगिता कुंभारे, सतीश ब्राम्हणवाडे आदींची उपस्थिती होती.

## रा.स्व. संघाचे महामानवाला अभिवादन



**पुलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुलगाव तालुक्याच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही प पु.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने नगरपरिषदेच्या प्रांगणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक अरविंद हलमारे, तालुका कार्यवाह मनोज राऊत, सहकार्यवाह विवेक पोहरे,नगर कार्यवाह विवेक लाखे,

सहकार्यवाह निखिल धोपाडे, तालुका समरसता प्रमुख विजयराव निवल, समरसता मंचाचे देविदास डाहे, विरेंद्र धोपाडे यांनी प. पु. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन व माल्यार्पण केले. यावेळी उपस्थित स्वयंसेवकांनी एकात्मता मंत्राचे पठण केले. यानंतर जयघोष करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा, तालुका व नगर कार्यकारिणी व नगरातील प्रमुख स्वयंसेवक उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर जयंती निमित्त पाणी प्याऊचे उदघाटन

**पुलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न,परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती चे औचित्य साधत वैष्णो ज्वेलर्स पुलगाव तर्फे

गांधी चौक येथे नागरीकांकरिता शितल जल ( प्याऊ ) चे उद्घाटन पोलीस निरीक्षक . राहूल सोनवने यांच्या हस्ते व माजी नगर अध्यक्ष मनीष साहू, साबीर भाई कुरेशी, हरगोवींदजी जायस्वाल, विजयराव निवल,महेश मोकाती, पियुष पोहरे, मारीया भाभी,जमील भाई,शांतीदेव खैरकार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.यावेळी गणमान्य




नागरीक उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .